# बीडच्या राजकारणात मोठी उलथापालथ

## मागील काही दिवसांपासून तुतारी या पक्षाकडून नाव येणारे शेख मुजीब यांच्या सासू झाल्या अचानक घड्याळच्या उमेदवार

### पप्पू कागदे यांचा ऐन वेळी पत्ता कट तर राष्ट्रवादीकडून प्रेमलता पारवेंना उमेदवारी

Email:- dailydivyawarta@Gmail.com
दिव्य वार्ता
Email:-editordivyawarta@gmail.com

## भाजपाने मोठा राजकीय खेळ खेळत एक उच्च शिक्षित उमेदवाराला उतरविले निवडणूकीच्या मैदानात

# डॉ.ज्योती घुमरे यांना दिली भाजपाकडून उमेदवारी

### आज उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस,नगर पालिकेत इच्छुक उमेदवारांची तोबा गर्दी

### नगरसेवक पदासाठी इच्छुक असणाऱ्या अनेक उमेदवारांचे पत्ते कट झाले, या पक्षातून उमेदवारी मागणारा अचानक त्या पक्षातून उमेदवारी घेतांना दिसून आला, राष्ट्रवादीकडून उमेदवारी पक्की असलेले शेख असरार यांनी अचानक एमआयएममध्ये प्रवेश करत उमेदवारी मिळवली

**माजी नगरसेवक डॉ.इद्रीस हाश्मी यांची उमेदवारी अचानकरित्या पक्षाने कापून टाकली**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या अनेक समर्थकांना पक्षानी उमेदवारी दिली, या समर्थकांकडून भविष्यात बंडखोरी झाल्यास पक्षाला याची मोठी किंमत मोजावी लागेल**

### राष्ट्रवादी काँग्रेसकडून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या समर्थकांना उमेदवारी देतांना विचार करूनच देणे गरजेचे होते





### अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित तुम्ही ज्याला उमेदवारी दिली त्याच्याकडून मुस्लिम समाजाच्या मस्जिदवरील भोंगे सुरक्षित राहतील का?



# बीडमध्ये होणार पाचरंगी लढत

**बीड, (दिव्य न्युज):– बीड नगरपालिकेच्या निवडणुकीचा माहोल चांगलाच तापला असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्याने नगरपालिकेत इच्छुकांची अक्षरशः प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. शहरातील सर्वच राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज दाखल करत बीडची निवडणूक रंगतदार बनवली आहे.**





नगराध्यक्ष पदावर ४० हून अधिक दावेदार यंदाच्या निवडणुकीत बीड नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी अनुसूचित जाती – महिला गटासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. या आरक्षणामुळे राजकीय समीकरणे बदलली असून या पदासाठी तब्बल ४० पेक्षा जास्त उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. शहरात महिलांच्या नेतृत्वाची मोठी चुरस तयार झाल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. २६ प्रभाग – ५२ नगरसेवक पदांसाठी ३००+ अर्ज बीड शहरात एकूण २६ प्रभाग असून प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवक निवडले जाणार आहेत. म्हणजेच निवडून येणाऱ्या नगरसेवकांची संख्या ५२ असणार आहे. या ५२ जागांसाठी आजपर्यंत ३०० पेक्षा जास्त इच्छुकांनी अर्ज दाखल केले आहेत. जवळपास प्रत्येक राजकीय पक्षात मोठी रस्सीखेच आणि अंतर्गत स्पर्धा दिसून आली. नगरपालिकेत उमेदवारांची उधळण – समर्थकांची गर्दी अर्ज भरण्यासाठी सकाळपासूनच उमेदवार आणि समर्थकांनी नगरपालिका कार्यालयाला घेरले होते. ढोल–ताशे, फटाके, जयघोष, पक्षांच्या पताकांनी परिसर रंगून गेला होता. निवडणुकीची चाहूल लागताच शहरात उत्साह आणि स्पर्धेचे वातावरण चांगलेच तापले आहे.



### अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रेमलता पारवे, शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्मिता वाघमारे, भाजपाकडून डॉ.ज्योती घुमरे, एमआयएमकडून श्रृंगारे सुरेखा, कॉंग्रेस आणि आम आदमी पक्षाकडूनही उमेदवार

# ५० कोटींचे दर्जेदार विकास कामे करणारे अमर नाईकवाडेंना प्रभागातील मतदारांचा जोरदार प्रतिसाद

## प्रभागात असा एक ही रस्ता नाही जिथे सिमेंट रस्ता नाही

### असे विकासाचे व्हिजन असणारे अमर नाईकवाडे यांची निवडणूक मतदारांनी घेतली हाती

### अमर नाईकवाडे म्हणजे एक सर्व समावेशक, धर्मनिरपेक्ष चेहरा



बीड, (दिव्य न्युज):- बीडच्या नगर पालिकेत एक अभ्यासू नगरसेवक म्हणून ज्यांची ओळख आहे ते म्हणजे अमर नाईकवाडे ज्यांना लोक अमर नाना असे म्हणून ओळखतात. डोक्यात प्रभागाचा आणि शहराचा विकास कसा साध्य करता येईल याच चिंतेत असलेले अमर नाईकवाडे यांना विकसाचा महामेरू म्हंटले तर वागवं ठरणार नाही. बीड शहराची अवस्था काय होती हे सर्वांनी आपल्या डोळ्यांनी पाहिलेली आहे. मागील विकासकर्त्यांनी शहराचे विकास तर सोडाच पण शहराला भकास करण्यास मागे पुढे पाहिले नाही. आलेला विकास निधी कसे हडप करायचा याच्या फिरागमध्ये असलेल्या त्या काळातील सत्ताधाऱ्यांना चांगलाच धडा त्यांनी शिकविला. आपल्या नियोजनबध्द आणि



अभ्यासातून त्यांनी हडप केलेली तो निधी त्यांच्या घषातून काढला आणि बीड शहरात जे रस्ते आज तुम्हाला दिसत आहेत ते फक्त आणि फक्त अमरनाना नाईकवाडे यांच्या नियोजनबध्द कामामुळेंच...

अमरनाना यांचा अत्यंत दांडगा जनसंपर्क असून प्रत्येक समाजात त्यांचे मित्र आहेत. ज्यांच्याशी त्यांचे मैत्रीपुर्ण संबंध आहेत. आपल्या प्रभागात अमर नाईकवाडे यांनी अत्यंत दर्जेदार आणि टिकावी कामे केली आहेत. जे आज सर्वांच्या नजरेसमोर आहेत. प्रभागात असा एकही रस्ता त्यांनी शिल्लक ठेवला नाही. लहान असो की मोठा सर्व रस्ते सिमेंट रस्ते करून घेतले आहेत. सीसी नाल्यांसह इतर मुलभुत कामे त्यांनी प्रभागात केली आहेत. प्रभागातील ५०० पेक्षा अधिक लोकांना त्यांनी घरकुल मिळवून दिले. श्रावणबाळ योजनेचा लाभ प्रभागातील लोकांना मिळवून दिला. लाडकी बहिण योजनेचा लाभ तर त्यांनी प्रभागातील प्रत्येक गरजु महिलांना मिळवून दिला म्हणुनच आज प्रभागात अमरनानांना मानणारे लाडक्या बहिणींना आपल्या लाडक्या भावाला नगरसेवक करण्याचा विडाच उचललेला आहे. ५० कोटी रूपयांपेक्षा जास्त रक्कमेचा विकास कामे प्रभागात केले आहेत. आता त्यांचा मानस आहे की प्रभागात एक चांगल्या प्रकारचे उद्यान करायचे आहे. प्रभागात असलेला मोठा नाला याचेही काम त्यांना करायचे आहे. असे या विकासाचे व्हिजन असणाऱ्या अमरनाना नाईकवाडेंना निवडणूक अत्यंत सोपी आहे. त्याचे कारण ही असे आहे की प्रभागातील मतदारांनीच आता नानांची निवडूक हाती घेतली आहे. या प्रभागाला एक सर्व समावेशक,धर्मनिरपेक्ष चेहरा मिळालेला असून अमर नाईकवाडे हे मोठ्या मताधिक्याने ही निवडणूक जिंकतील यामध्ये कोणालाच शंका नाही.

# मोईन मास्टर यांची पुण्याई अशफाक इनामदारांची साथ आणि मतदाराचा आशिर्वाद

## सय्यद नदीम यांचा विजय निश्चित करणार





बीड, (दिव्य न्युज):- बीडच्या नगर पालिकेत अनेक दिग्गजांनी आपले कर्तव्य बजाविलेले आहे. यामध्ये ज्यांचे नाव मोठ्या आदरांनी घेतले जाते ते म्हणजे जेष्ठ समाजसेवक मोईन मास्टर यांचे... मास्टर साहेबांनी ४० वर्षापेक्षा जास्त नगर पालिकेचे सभागृह गाजविलेले आहे. १९७४ पासून ते बीडच्या नगर पालिकेत नगरसेवक, सभापती, उपनगराध्यक्ष अशी पदे त्यांनी भुषविले आहेत अशा या जिगरबाज काकांचा पुतण्या आज प्रभाग क्रं. १८मधून निवडणुकीच्या रिंगणात आपली पहिली विनिंग खेळण्यासाठी उतरला आहे.

### सय्यद नदीम यांचा जनसंपर्क आणि मैत्रीपूर्ण संबध आणि आश्पाक इनामदार यांचा नियोजनबध्द प्रचारामुळे आश्पाक इनामदार आणि सय्यद नदीम यांचा विजय हा काळ्या दगडावरची पांढरी रेगच...

प्रभाग क्रं. १८ हा मोईन मास्टर यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या प्रभागात मोईन मास्टर यांचे नातेवाईक आणि त्यांना मानणाऱ्यांची मोठी संख्या आहे. मास्टर साहेब यांच्या आयुष्याचा अर्धा भाग याच प्रभागात गेलेले आहे. मास्टर साहेब यांनी या प्रभागासाठी अनेक कामे केलेली आहेत. त्यामध्ये महत्वाचे सांगायचे झाले तर गुलजार पुरा हा त्यांचे एकमेव मोठे उदाहरण देता येईल. तकिया मस्जिद कब्रस्तान असो की त्यामधील विकास कामे असो... मास्टर साहेबांचे काम हे संपूर्ण राज्याने पाहिलेले आहे. कोविडच्या काळात आपल्या वयाचा विचार न करता त्यांना महिनो महिने, रात्रं दिवस यासाठी काम केलेले आहे. ते स्वतः जिल्हा रूग्णालयात उपस्थित राहुन रूग्णांना दिलासा देत होते तर ज्यांना या रोगामुळे मृत्यू झाला त्यांची दफनविधी करण्याचे काम ही मास्टर साहेबांनी केलेले आहे. अशा या जिगरबाज काकांचे पुतणे निवडणूकीच्या रिंगणात असून प्रभाग क्रं. १८ मधून अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूकीची आपली पहिली विनिंग खेळत आहेत. सय्यद नदीम यांना मोईल मास्टर यांची पुण्याई आणि आश्पाक इनामदार यांची साथ आणि मतदारांचा आशिर्वाद यामुळे नदीम आणि आश्पाक इनामदार यांचा विजय निश्चित करणारा आहे. सय्यद नदीम यांचा मोठा दांडगा जनसंपर्क या प्रभागात आहे. आश्पाक इनामदार हे या प्रभागातून तीनदा नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत. मागच्या निवडणूकीत अल्पशा मतांनी त्यांचा पराभव झालेला आहे. याची खंत आजही या प्रभागातील मतदारांच्या मनात घर करून आहे. मागची चुक दुरूस्त करण्याची संधी आता प्रभागातील मतदारांला आल्याची मतदार स्वतः म्हणत आहेत. आश्पाक इनामदार यांनी या प्रभागात अनेक विकास कामे केलेलीआहेत. या वर्षेभरात एका नगरसेवकाला लाजवेल अशी कामे त्यांनी प्रभागात केलेली आहेत . करोडो रूपयांचा निधी आणून त्यांनी प्रभागात दर्जेदार सिमेंट रस्ते, सिमेंट नाली आणि स्ट्रीट लाईटची कामे केलेली आहेत. आश्पाक इनामदार यांचा मोठ्या प्रमाणात मित्र परिवार आणि दांडगा जनसंपर्क असल्याने ही निवडणूक दोघांनाही अवघड नाही. एक अभ्यास नगरसेवक म्हणुन आणि चाणक्यनिती कशी करावी यामध्ये चाणक्य असलेले आश्पाक इनामदार या साथीदारामुळे प्रभाग क्रं. १८ मधून आश्पाक इनामदार आणि सय्यद नदीम हे नगरसेवक होवून नगर पालिकेच्या सभागृहात जावून विकासाची गंगा या प्रभागात आणल्याशिवाय राहणार नाहीत.....

# प्रभाग क्रं. १७ मधून मोहम्मद असरार यांचा पतंग घेणार भरारी

## एमआयएमकडून उमेदवारी मिळाल्याने प्रभागातील मतदारांचा मोठा जल्लोष

### सर्वांना सोबत घेवून चालणारा युवा नेता म्हणून मोहम्मद असरार यांची ओळख





**बीड, (दिव्य न्युज):- प्रभाग क्रं. १७ मधून एमआयएम यावेळी मोठ्या मताधिक्याने विजयी उत्सव साजरा करणार आहे. या प्रभागातून एमआयएम पक्षाने एक तगडा उमेदवार रिंगणात उतरविला असून मोहम्मद असरार यांचा या प्रभागात मोठा आणि दांडगा जनसंपर्क आहे. मागील दोन ते तीन वर्षापासून या प्रभागात स्वतः झोकून दिले आहे. स्व खर्चाने अनेक कामे त्यांनी या प्रभागात केलेली आहेत.**

मोहम्मद असरार यांचा पतंग मोठी भरारी घेणार असून देशाचे नेते खा.बॅरिस्टर असोसिद्दीन ओवेसी धडाकेबाज भाषण करणारे ज्यांच्या भाषणामुळे निवडणुकीचा निकाल बदलुन जातो. ते आ.अखबरोद्दीन ओवेसी आणि औरंगाबादचे मा.खा.इमत्यिाज जलील यांच्या नियोजनबध्द प्रचारामुळे आणि एमआयएमचे जिल्हाध्यक्ष अॅड.शेख शफिक यांच्या व्हिव रचनेमुळे शहरात अनेक प्रभागात एमआयएम चा पतंग मोठी भरार घेणार आहे. मागील निवडणूकीत एमआयएम पक्षाचे ९ नगरसेवक मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. त्यावेळी थेट जनतेतूनच नगराध्यक्ष निवडणूक झाली होती. त्यावेळी ही एमआयएम पक्षाचे उमेदवार हे दुसऱ्या क्रमांकावर होते. २० हजारांपेक्षा जास्त मतदान या उमेदवाराला मिळालेले आहेत. आता तर एमआयएमची व्याप्ती वाढलेली आहे. आज एमआयएम पक्षाने तीस पेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविलेलेआहेत. त्यासोबत नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ही निवडणुकीच्या मैदानात असून यामुळे इतर पक्षाच्या उमेदवारांना मात्र धडकी भरलेली आहे. या प्रभागात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने मुस्लिम विरोधी भुमिका घेणाऱ्या उमेदवाराला मैदानात उतरविलेलेआहे. ज्या उमेदवाराने मुस्लिम समाजाच्या धार्मिक स्थळावरून भोंगे काढण्यासाठी प्रयत्न केले, मुस्लिम महापुरूषांच्या विरोधात वारंवार वक्तव्य करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अशा उमेदवाराला घरी पाठविण्याची तयारी या प्रभागातील मतदारांनी केली असून ज्या पुढाऱ्यांनी असल्या मातेफिरू उमेदवाराला उमेदवार करून मैदानात उतरविलेले आहे. त्या पुढाऱ्यांनाही या उमेदवाराची जागा काय आहे हे दाखवून देण्याचा निश्चिय केलेला असून या प्रभागातून मोहम्मद असरार हे नगरसेवक म्हणून निवडून येणारच आहेत. कारण प्रभागातील मतदारांनी आता निवडणूक हाती घेतली असून येणाऱ्या २ तारखेला पतंग या चिन्हासमोरील बटन दाबण्याचा निश्चय मतदारांनी केलेला आहे.